महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

**सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५**

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

---

**पी-कॉम/फिडर व्यवस्थापक योजना /७७४९** **दिनांक: १०.०३.२०१६**

## वाणिज्य परिपत्रक क्र. २६१

***(वाणिज्य परिपत्रक क्र. २३९ चे शुध्दीपत्र )***

**विषय:- फिडर व्यवस्थापक योजना- मार्गदर्शकतत्वे**

महावितरणतर्फे प्रस्तावित करण्यात आलेल्या फिडर व्यवस्थापक या नवीन अभिनव योजनेची मार्गदर्शकतत्वे तसेच ठळक वैशिष्ठये संदर्भित परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आलेली आहेत.

फिडर व्यवस्थापक योजनेला अल्प प्रतिसाद बघता तसेच सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरिता वाणिज्य परिपत्रक क्र. २३९ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मधील मार्गदर्शकतत्वांमध्ये सुधारणा करण्यात आलेली असुन सुधारीत मार्गदर्शकतत्वे खालीलप्रमाणे आहेत.

**(१) फिडर व्यवस्थापकासाठी अर्हता:-**

(१.२) संबंधिताकडे वैध असलेली विद्युत कंत्राटा संबंधातील नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच फिडर व्यवस्थापक म्हणून नियुक्त होणा-या व्यक्तीने **किमान ५ आय.टी.आय.** (इलेक्ट्रीशियन) उत्तीर्ण कर्मचारी अथवा ज्यांना महावितरणमध्ये अशाचप्रकारच्या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आहे असे कर्मचारी त्यांच्या अधिनस्थ नियुक्त करणे आवश्यक असेल. मात्र असे कर्मचारी नियुक्त करताना महावितरणकडे किंवा अन्य फ्रॅन्चायजीकडे अथवा महावितरणच्या कंत्राटदाराकडे विद्युतीकरणासंदर्भात काम केलेल्या कर्मचा-यांना प्राधान्य देणे आवश्यक राहील.

ऐवजी

(१.२) संबंधिताकडे वैध असलेली विद्युत कंत्राटा संबंधातील नोंदणी असणे आवश्यक आहे. **फिडर व्यवस्थापकास हस्तांतरीत करण्यात आलेल्या फिडरवर असलेली एकूण ग्राहक संख्या व भौगोलिक परिस्थितीला अनुसरुन कर्मचा-यांची नियुक्ती व्हावी. त्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तक्ता दिलेला आहे.**

**वाहिनीवरील ग्राहक संख्या १५०० पर्यत असल्यास कमीत कमी ३ कर्मचारी तसेच १५०१ ते २५०० ग्राहक संख्या असल्यास कमीत कमी ४ कर्मचारी, २५०१ ते ४००० ग्राहक संख्या असल्यास कमीत कमी ५ कर्मचारी व ४००१ पुढील प्रत्येक १००० ग्राहकास अधिकचा एक कर्मचारी याप्रमाणे असावा.**

फिडर व्यवस्थापकांकडे नियुक्त असलेला कर्मचारी हा आय.टी.आय. (इलेक्ट्रीशियन) उत्तीर्ण अथवा ज्यांना महावितरणमध्ये अशाचप्रकारच्या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आहे असे कर्मचारी त्यांच्या अधिनस्थ नियुक्त करणे आवश्यक असेल. मात्र असे कर्मचारी नियुक्त करताना महावितरणकडे किंवा अन्य फ्रॅन्चायजीकडे अथवा महावितरणच्या कंत्राटदाराकडे विद्युतीकरणासंदर्भात काम केलेल्या कर्मचा-यांना प्राधान्य देणे आवश्यक राहील.

या व्यतिरिक्त स्थानिक गरजेनुसार जसे हि वाहिनीची कमी अधिक लांबी, वाहिनीवरील ग्राहक संख्या विचारात घेऊन कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात मुख्य अभियंता, सं व सु, परिमंडळ निर्णय घेऊ शकतात.

**(२) सदर प्रयोजनासाठी वीज वाहिनीचे तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्थापकाला हस्तांतरण करण्यापूर्वीची कार्यवाही:-**

(२.१) वीज वाहिनीचे तात्पुरत्या कालावधीसाठी फिडर फ्रॅन्चायजी व्यवस्थापकाकडे हस्तांतरण करण्यापूर्वी तांत्रिक व वाणिज्यिक हानीचे मुल्यांकन करण्यासाठी नोडल अधिकरी म्हणून कार्यकारी अभियंता, (सं व सु) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. नोडल अधिकारी यांनी मूल्यांकनाचा दिनांक व तपशील घोषित करणे आवश्यक राहील. असे मूल्यांकन निर्देशित करण्यासाठी मागील १२ महिन्यांचा तपशील काढून त्याची सरासरी आधारभूत धरण्यात येईल.

ऐवजी

(२.१) वीज वाहिनीचे तात्पुरत्या कालावधीसाठी फिडर व्यवस्थापकाकडे हस्तांतरण करण्यापूर्वी तांत्रिक व वाणिज्यिक हानीचे मुल्यांकन करण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, (सं व सु) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. नोडल अधिकारी यांनी मूल्यांकनाचा दिनांक व तपशील घोषित करणे आवश्यक राहील. असे मूल्यांकन निर्देशित **करण्यासाठी मागील ३६ महिन्यांचा** तपशील काढून त्याची सरासरी आधारभूत धरण्यात येईल.

**(७) निवडीचे निकष :-**

(७.३) कोणत्याही फिडर व्यवस्थापकाला जास्तीत जास्त २ वाहिन्यांचे व्यवस्थापन देय असेल अपवादात्मक परिस्थितीत सविस्तर कारणे नमूद करुन जास्तीत जास्त ५ वाहिन्यांपर्यंतचे व्यवस्थापन एका फिडर व्यवस्थापकाला देण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता यांना असतील.

ऐवजी

(७.३) कोणत्याही फिडर व्यवस्थापकाला जास्तीत जास्त ५ वाहिन्यांचे व्यवस्थापन देय असेल. फिडर व्यवस्थापक योजनेच्या **निविदा काढतांना फिडरची संख्या ठरविण्याचे अधिकार निविदा अधिकारी यांना** असतील.

**(१०) फिडर व्यवस्थापनाला देय असणारा मोबदला :-**

(१०.४) फिडर व्यवस्थापकाला देय असलेला स्थिर मोबदला हा क्षेत्रानुसार बदलत राहिल. उदाहरणार्थ:- एकूण ६५३९ ग्राहक असलेल्या एका वाहिनीवर वीजदेयकासंबंधीचे कामासाठी अंदाजे रक्कम रु. ३२६९५/- तसेच इतर कामे जे कंत्राटदारांमार्फत करुन घेतले जातात व त्यांचे विहित दरानुसार असलेली अंदाजे रक्कम रु.२५७५०/-अशी एकूण प्रतिमाह रक्कम रु.५८४४५/- मोबदला मिळाण्याची खात्री राहिल. सोबत नमूना गणना पत्रक जोडलेले आहे.

वीजदेयकासंबंधीचे कामासाठी तसेच इतर कामे जे कंत्राटदारांमार्फत करुन घेतले जातात अशा कामांचा मोबदल्याचा विहित दर (Schedule Charges) जे भौगोलिक परिस्थितीनुसार, देण्याचे अधिकार त्या ठिकाणच्या अधिक्षक अभियंता यांना असेल.

(१०.५) वितरण हानी कमी न होता कायम राहिल्यास अथवा महसुलात वाढ न होता कायम राहिल्यास फिडर व्यवस्थापकाला स्थिर आकार देय राहिल.

(१०.६) फिडर व्यवस्थापकाने सादर केलेल्या बिलाच्या ७०% रक्कम अदा करण्यात यावी. तसेच उर्वरित ३०% रक्कम फिडर व्यवस्थापकाच्या कामगिरीच्या आधारे देय राहील.

**(११) फिडर व्यवस्थापकाला प्रोत्साहनपर रक्कम द्यावयाची पध्दत :-**

(११.१) फिडर व्यवस्थापकाना हस्तांतराच्या वेळेस असलेला वाहिनीवरील वीज वितरण हानी कमीत कमी १% कमी केल्यामुळे महावितरणच्या **महसूलात होणा-या वाढीच्या रक्कमेपैकी २० % रक्कम प्रोत्साहनपर** रक्कम म्हणून फिडर व्यवस्थापक यांना देय असेल व

(११.३) वीज बिल वसूली क्षमतेमध्ये नोडल अधिका-यांनी वाहिनीसाठी घोषित केलेल्या महसूलापेक्षा ०५% किंवा अधिक वाढ झाल्यास प्राप्त होणा-या अतिरिक्त महसूलाच्या १०% रक्कम प्रोत्साहनपर रक्कम म्हणून फिडर फ्रॅन्चायजी व्यवस्थापक यांना देण्यात येईल.

ऐवजी

(११.१) फिडर व्यवस्थापकास प्रोत्साहनपर रक्कम फक्त तांत्रिक तसेच वाणिज्यिक वीज वितरण हानी (DCL) कमी करण्यासाठी लागू असेल.

- अ, ब, क, ड गटातील वाहिनीवरील महसूलात होणाऱ्या वाढीच्या रक्कमेपैकी ३०% रक्कम
- ई, एफ, जी (जी १, जी २, जी ३) गटातील वाहिनीवरील महसूलात होणा-या वाढीच्या रक्कमेपैकी २५% रक्कम

तसेच वीज बिल वसूली क्षमतेमध्ये वाढ झाल्यास फिडर व्यवस्थापकास प्रोत्साहनपर रक्कम देय नसेल.

(११.२) वाहिनीवर सध्या असलेल्या तांत्रिक तसेच वाणिज्यिक वीज वितरण हानीमध्ये **(DCL) ३% घट केल्यानंतरच** फिडर व्यवस्थापक यांना प्रोत्साहन पर रक्कम देय असेल.

ऐवजी

(११.२) वाहिनीवर सध्या असलेल्या तांत्रिक तसेच वाणिज्यिक वीज वितरण हानीमध्ये **(DCL) १% घट केल्यानंतरच फिडर व्यवस्थापक यांना वरील ११.१ नुसार** प्रोत्साहन पर रक्कम देय असेल.

**(१२) दंडः-**

(१२.१) नेमून दिलेल्या वाहिनीवर ६ महिन्यानंतर घोषित केलेल्या वीज वितरण हानीच्या तूलनेत वाढ झाल्यास अथवा सरासरी वीज बिल वसूली क्षमतेच्या (कलेक्शन एफिशियन्सी) तूलनेत घट झाल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

अ) वितरण हानीमध्ये १% वाढ झाल्यास फिडर व्यवस्थापकाला एकूण देय रक्कमेच्या ५% रक्कम.

ब) वीज बिल वसूली क्षमतेमध्ये (कलेक्शन एफिशियन्सी) ३% घट झाल्यास स्थिर आकाराच्या रक्कमेच्या ५% रक्कम.

ऐवजी

(१२.१) फिडर व्यवस्थापकाकडून नुकसान झालेल्या रक्कमेची दंडात्मक वसूली करण्यात येईल.

फिडर व्यवस्थापक योजने संदर्भातील वरील सुधारीत मार्गदर्शकतत्वे त्वरीत अंमलात येतील.

10.3.16

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवानाः प्रेषण यादी प्रमाणे.**